MHNB070002992024

सं.फौ.ख.क्र. १४३/२०२४
अपराध क्र. ७७/२०२४
शासन –वि– जोरदार जोदा पावरा
नि.क्र. १४ सलग

## न्यायनिर्णय

( दि. ऑगस्ट ०४, २०२६ रोजी घोषीत )

अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. डी. बी. वळवी तसेच बचाव पक्षातर्फे विद्वान वकील श्री. डी. आर. वळवी यांचा युक्तीवाद ऐकला.

०२. अभियोग पक्षाचे असे म्हणणे आहे की, आरोपी हा दि. १४.०४.२०२४ रोजी माळ गावात रस्त्यालगत एका कुडाच्या झोपडीचे आडोशाला एका खाकी रंगाचे खोक्यात सोम पॉवर १०००० सुपर स्ट्राँग बिअर चे ५०० मिलीचे एकूण २४ नग असा एकूण २,८८०/– रुपये किंमतीचा मुद्देमाल विनापरवाना बेकायदेशीररित्या कब्जात बाळगताना मिळुन आला.

०३. अभियोग पक्षाने सदर प्रकरणात एक पंचसाक्षीदार यांना तपासले. सदरचे प्रकरण संक्षिप्त स्वरुपाचे असून जवळपास दोन वर्षांपेक्षा जास्त जुने आहे. आरोपीविरुध्द कोणताही पुरावा आढळून आला नाही. सदर साक्षीदाराचा पुरावा आणि अभिलेखावरील परिस्थिती लक्षात घेता अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. पुराव्याअभावी आरोपीचे फौ.प्र.सं.कलम ३१३ अन्वये जवाब नोंदविले नाही. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद आणि अभिलेखाच्या अवलोकनावरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ समोर आले. त्या प्रत्येक मुद्दयास मी निर्वाळा देत त्यांच्याखाली त्या निर्वाळयाचे कारण नोंदविले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निर्वाळा |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, आरोपी हा अवैधरित्या विदेशी दारु बाळगून असतांना मिळून आला? | ... नाही. |
| २. | आदेश काय ? | ... आरोपी निर्दोष. |

## कारणमिमांसा

०४. सदर प्रकरणात अभियोग पक्षाने पंच साक्षीदार **रोहिदास जोमा पावरा** (**सा. क्र. १**) यांना तपासले. त्याने पुराव्यात, आरोपी संबंधाने त्याच्या समक्ष कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, असे सांगीतले. त्याने जप्ती पंचनाम्यावरील वरील फक्त सही ओळखली. त्यानंतर, संपूर्ण मजकूर नाकारला. वि.सहा.सरकारी वकील यांनी त्यांना बरेच सूचक प्रश्न विचारले. परंतु, आरोपीविरुध्द कोणताही पुरावा आढळून आला नाही. यावरुन, पोलीसांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जावुन कार्यवाही केल्याच्या बाबीवर संशय निर्माण होतो. तसेच अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपी हा वर नमुद मुद्देमाल बाळगून असतांना मिळून आला, या बाबीवर संशय निर्माण होतो.

०५. सर्वात महत्वाचे म्हणजे तपासी अधिकारी छापा टाकणा–या चमुपैकी एक सदस्य होते. त्यामुळे निःपक्ष तपासाच्या नैसर्गिक तत्वाला तडा देण्यात आला आहे. त्यामुळे संपुर्ण तपासच संशयाच्या भोव–यात पडतो. त्याचबरोबर आजपर्यंत प्रस्तुत प्रकरणात रासायनिक परीक्षणाचा अहवाल दाखल केलेला नाही. त्यामुळे सदरचा जप्त मुद्देमाल विदेशी दारुचा होता या पोलीसांच्या केलेल्या कारवाईवर संशय निर्माण होतो. अशाप्रकारे अभियोग पक्षाने आपली बाजू संशयापलिकडे सिध्द केल्याचे दिसत नाही. त्यामुळे आरोपीवर ठेवलेले कलम ६५(ई) चे दोषारोप सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवितो.

०६. प्रभारी अधिकारी, पो.स्टे. धडगांव यांनी सदर गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त केला असल्यामुळे त्यासंबंधाने निर्देश देणे आवश्यक आहे. फौ.प्र.संहितेचे कलम ४३७–अ ची पुर्तता आरोपीने केलेली आहे. शेवटी मुद्दा क्र.२ ला उत्तर देतांना खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे;

## आदेश

१) फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१), नुसार आरोपी **जोरदार जोदा पावरा, वय २६ रा. माळ, ता. धडगांव, जि. नंदुरबार** याची महाराष्ट्र प्रतिबंधक अधिनियम कलम ६५(ई) च्या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) प्रभारी अधिकारी, पो.स्टे.धडगांव यांना निर्देश देण्यात येते की, सदर गुन्हयात जप्त मुद्देमाल अपील कालावधीनंतर किंवा अपील दाखल न झाल्यास योग्य ती विल्हेवाट लावण्याकरिता राज्य उत्पादन शुल्क, नंदुरबार यांच्याकडे पाठवावा.

३) आरोपीने सादर केलेले जमानतीचे बंधपत्र फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ नुसार पुढील सहा महिन्याकरीता वैध राहतील.

Digitally signed by BHUSHAN SHANKAR WADHAI
Date: 2026.08.04 16:14:29 +0530

धडगांव (भुषण शं. वाढई)

ऑगस्ट ०४, २०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

धडगांव, जि. नंदुरबार

दा ख ला

दाखला देण्यात येतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | पल्लवी अशोक सोनार |
| न्यायालयाचेनाव | : | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, धडगांव |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णय जाहिर केल्याची तारीख | : | ०४.०८.२०२६ |
| न्यायाधिशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०४.०८.२०२६ |
| न्यायानिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | ०४.०८.२०२६ |